# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः 28.11.2024** **वारःगुरुवार**

---

- बाल विवाहमुक्त भारत राष्ट्रीय अभियानाचा नवी दिल्लीत शुभारंभ; राज्यातही विविध कार्यक्रम

- राज्यात सत्तास्थापनेसाठी दिल्लीतील भाजपा नेतृत्वाला सर्वाधिकार – मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची ग्वाही

- अहिल्यानगरमध्ये यांत्रिकी पायदळाच्या चार तुकड्यांना राष्ट्रपतींचा ध्वज प्रदान आणि,

- राज्यात थंडीचा कडाका; पुढील दोन दिवस ही लाट कायम राहण्याचा अंदाज

**<u>बाविमुभा</u>**

बाल विवाह मुक्त भारत या राष्ट्रीय अभियानाची केंद्र सरकारनं काल नवी दिल्लीत सुरुवात केली. भारताला बालविवाहमुक्त राष्ट्र बनवणं हा या मोहिमेचा प्राथमिक उद्देश आहे. सरकारनं ही मोहिम केंद्रित पद्धतीनं राबविण्यासाठी 130 जिल्हे निश्चित केले असल्याचं महिला आणि बालविकास मंत्री अन्नपूर्णा देवी यांनी या मोहिमेचा शुभारंभ करताना सांगितलं. बालविवाह हा केवळ फौजदारी गुन्हा नसून मानवी हक्कांचं उल्लंघन आहे असं सांगून मंत्री म्हणाल्या की, बाल विवाह मुक्त भारत मोहीम हा केवळ काही दिवसांचा कार्यक्रम नसून एक निरंतर प्रयत्न आहे आणि भारत बालविवाहापासून मुक्त होईपर्यंत तो सुरू राहील. अन्नपूर्णा देवी यांनी बालविवाहमुक्त भारत पोर्टलचं अनावरणही केलं. जागरूकता वाढवणं, बालविवाह रोखणं आणि बालविवाहाच्या घटनांची प्रभावीपणे नोंद करणं याद्वारे मोहिमेला पाठिंबा देण्यासाठी हे ऑनलाइन व्यासपीठ विकसित केलं आहे.

बाल विवाह मुक्त अभियानाच्या शुभारंभानिमित्त राज्यातही विविध कार्यक्रम झाले.

धुळे जिल्ह्यातल्या सर्व ग्रामपंचायतींमध्ये बाल विवाह प्रतिबंधक ठराव करण्यात आला. ग्रामस्थांनी बालविवाह होणार नाही, याबाबत प्रतिज्ञा घेतली.  गडचिरोली शहरात बालविवाहमुक्त गडचिरोलीचा संकल्प करून जनजागृती फेरी काढण्यात आली.

**<u>सत्तास्थापना</u>**

राज्यातील सत्तास्थापनेच्या पार्श्वभूमीवर शिवसेनेच्या आमदारांनी भाजपाचे ज्येष्ठ नेते गृहमंत्री अमित शहा यांची काल नवी दिल्लीत भेट घेतली. मात्र या बैठकीत सत्ता स्थापनेबाबत चर्चा झाली नसल्याचं शिवसेनेचे नेते केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी बैठकीनंतर पत्रकारांना सांगितलं. भाजपाचं वरिष्ठ नेतृत्व पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा जो निर्णय घेतील, तो आम्हाला पूर्णपणे मान्य असेल, असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल ठाण्यात पत्रकारांशी बोलतांना स्पष्ट केलं.

पक्षश्रेष्ठींसोबत चर्चेद्वारे सर्व निर्णय घेतले जातील असं उप-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागपुर इथं माध्यमांशी बोलताना सांगितलं.

राष्ट्रवादी कॉंग्रेसचे नेते अजित पवारही दिल्लीत दाखल झाले असून सत्ता स्थापनेबद्दल खेळीमेळीनं निर्णय घेण्यात येईल, अशी ग्वाही पवार यांनी दिली.

राज्यातलं महायुतीचं सरकार मजबूत आणि अभेद्य असून भाजपाचं केंद्रीय नेतृत्व जो निर्णय घेईल, तो सर्वांनाच मान्य असेल, अशा शब्दांत भाजपाचे आमदार चंद्रशेखर बावनकुळे यांनी नागपूर इथं पत्रकार परिषदेत एकनाथ शिंदे यांच्या भूमिकेचं समर्थन केलं.

महायुतीच्या घटक पक्षांच्या नेत्यांची आज अमित शहा यांच्याबरोबर संयुक्त बैठक होणार असून त्यानंतर सरकार स्थापनेबद्दल चित्र स्पष्ट होण्याची अपेक्षा आहे.

**<u>संसद</u>**

अदानी लाचखोरी प्रकरणावरून विरोधकांनी केलेल्या गदारोळामुळे संसदेच्या दोन्ही सदनांचं कामकाज कालही दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं. गौतम अदानी यांना अटक करण्याची मागणी राहुल गांधी यांनी केली.

**<u>आळंदी</u>**

आळंदीमध्ये आज माऊलींचा संजीवन समाधी दिन सोहोळा होत असून राज्यभरातून लाखो भाविक यासाठी तिथं दाखल झाले आहेत. कार्तिक वद्य द्वादशीनिमित्त माऊलींचा रथोत्सव काल दीडशे वर्ष जुन्या लाकडी रथामधून साजरा झाला. टाळ मृदुंगाच्या निनादात आणि माऊलींच्या जयघोषात आळंदीचा परिसर भारावून गेला आहे.

**<u>वॉका-नैसर्गिक-शेती</u>**

**<u>इंट्रो-</u>**

केंद्रीय मंत्रिमंडळानं कृषी आणि कृषक कल्याण मंत्रालयाच्या अंतर्गत, केंद्र प्रायोजित स्वतंत्र योजना म्हणून, नैसर्गिक शेतीवरील राष्ट्रीय मिशनला मान्यता दिली आहे. काय आहे हे नैसर्गिक शेती मिशन...त्याचा हा वृत्तांत...

**<u>स्क्रीप्ट</u>**

सर्वांना सुरक्षित आणि पौष्टिक अन्न मिळावं, यासाठी नैसर्गिक शेतीच्या पद्धतींना प्रोत्साहन देण्याचं या मिशनचं उद्दिष्ट आहे. शेतकऱ्यांना लागवडीचा खर्च कमी करणं आणि बाहेरून खरेदी केलेल्या साहित्यावरील अवलंबित्व कमी करण्यासाठी मिशनची आखणी करण्यात आली आहे. नैसर्गिक शेतीमुळं मातीची निरोगी परिसंस्था तयार होईल, जैवविविधतेला चालना मिळेल आणि स्थानिक कृषीशास्त्राला अनुरूप वैविध्यपूर्ण पीक पद्धतींना प्रोत्साहन मिळेल. पुढील दोन वर्षांत, इच्छुक ग्रामपंचायतींमधील 15 हजार क्लस्टर्समध्ये 1 कोटी शेतकऱ्यांच्या साडेसात लाख हेक्टर क्षेत्रात नैसर्गिक शेती सुरू केली जाईल. गरजेनुसार 10 हजार जैव-साधन सामग्री केंद्रं स्थापन केली जातील. इच्छुक शेतकऱ्यांना त्यांच्या गावाजवळील आदर्श प्रात्यक्षिक शेतांमध्ये प्रशिक्षण दिलं जाईल. शेतकरी त्यांच्या पशुधनाद्वारे जीवनामृत, बीजामृत इत्यादी साहित्य तयार करतील. शेतकऱ्यांना जागरुक आणि सहाय्य करण्यासाठी 30 हजार कृषी सखी तैनात केले जातील. नैसर्गिक शेती उत्पादनांना बाजारपेठ मिळवून देण्यासाठी एक सोपी प्रमाणपत्र प्रणाली आणि समर्पित सामायिक ब्रँडिंगची सुविधा राहील. 2026 पर्यंत हे मिशन राबविण्यासाठी अडीच हजार कोटी रुपये तरतूद करण्यात आली आहे. आकाशवाणीच्या बातम्यांसाठी, लौकिका रास्ते, पुणे.

**<u>ध्वजप्रदान</u>**

अहिल्यानगरमध्ये लष्कर प्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांनी मेकॅनाइज्ड इन्फंट्री सेंटर आणि स्कूल इथं काल एका दिमाखदार समारंभात चार तुकड्यांना राष्ट्रपतींचा ध्वज प्रदान केला. देशसेवेसाठी केलेल्या उल्लेखनीय आणि आदर्श योगदानाचा सन्मान करण्यासाठी हा प्रतिष्ठेचा ध्वज प्रदान करण्यात आला. आपल्या भाषणात लष्करप्रमुखांनी मेकॅनाइज्ड इन्फंट्रीनं विविध कारवायांमध्ये आणि संयुक्त राष्ट्र शांतता मोहिमांसह अनेक महत्त्वाच्या मोहिमांमध्ये

असाधारण शौर्य, शिस्त आणि कार्यक्षमतेचा परिचय दिला असल्याबद्दल त्यांचं कौतुक केलं. वेगानं बदलणाऱ्या युद्धतंत्राच्या परिस्थितीत, मेकॅनाइज्ड इन्फंट्रीनं भविष्यकालीन तंत्रज्ञान आत्मसात केल्याचं जनरल द्विवेदी यांनी सांगितलं.

**<u>द्विवेदी</u>**

जम्मू-काश्मीरमध्ये दहशतवाद ते पर्यावरण असा बदल झाला असून सीमावर्ती पर्यटन धोरणानुसार त्या भागात लवकरच ४८ ठिकाणी सुविधा होणार असल्याचं लष्कर प्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांनी काल पुणे विद्यापीठात भारताच्या विकासात आणि संरक्षणात भारतीय लष्कराची भूमिका आणि योगदान या विषयावर बी. सी. जोशी स्मृती व्याख्यान देताना सांगितलं. साहसी खेळ, गिर्यारोहण, पदभ्रमण अशा माध्यमातून सीमा पर्यटनात युद्धभूमीवरील जवानांचं आयुष्य लोकांना जवळून पाहता येईल, लष्कर आणि जनमानसातील संवाद वाढेल असं ते म्हणाले. लष्करी साहित्याला लागणाऱ्या सुट्या भागांच्या निर्मितीमध्ये महाराष्ट्र आणि विशेषतः पुण्याचं योगदान महत्वाचं असल्याचंही त्यांनी नमूद केलं. लष्करानं अलिकडे केलेल्या अनेक योगदानांची सविस्तर माहिती त्यांनी या व्याख्यानात दिली.

**<u>सावरकर</u>**

रत्नागिरी इथं स्थानबद्ध असताना स्वातंत्र्यवीर सावरकर शिरगाव इथल्या दामले यांच्या घरात राहायला गेले, त्या घटनेला काल 100 वर्षं पूर्ण झाली. सावरकरांच्या अमूल्य स्मृतींचा ठेवा असलेली ती खोली दामले कुटुंबीयांनी जपून ठेवली आहे. त्याविषयी अधिक वृत्तान्त आमच्या प्रतिनिधीकडून...

**<u>स्क्रिप्ट</u>**

रत्नागिरी ही स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांची कर्मभूमी. ब्रिटिशांनी अंदमानातून त्यांची सुटका केल्यानंतर सहा जानेवारी १९२४ पासून साडेतेरा वर्षं त्यांना रत्नागिरीत स्थानबद्ध करून ठेवलं होतं. त्याच वर्षी प्लेगची साथ आल्यामुळे ते रत्नागिरीजवळच्या शिरगावमध्ये राहायला गेले. सावरकरांना आश्रय देणं म्हणजे ब्रिटिश सरकारचा रोष ओढवून घेण्यासारखंच होतं; मात्र शिरगावच्या गायवाडीतले विष्णुपंत काशिनाथ दामले यांनी तसा विचार केला नाही. सावरकरांनी जातिभेद आणि अस्पृश्यता निवारणाचं कार्य रत्नागिरीत हाती घेतलं. डॉ. हेडगेवार यांनी याच खोलीत सावरकरांची भेट घेतली होती. त्यानंतर मार्च 1925 मध्ये राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना झाली. सावरकरांनी या खोलीत नाट्य आणि ग्रंथलेखनही केलं. या महान नेत्याच्या प्रेरक आठवणींचा वारसा असलेली ती खोली दामले यांच्या पाचव्या पिढीनेही आदरपूर्वक जतन करून ठेवली आहे. सावरकरांची लेखणी, दिवा आणि हस्ताक्षरातली प्रतही तिथे जपून ठेवण्यात आली आहे. संशोधक आणि देश-परदेशातले नागरिक हा अमूल्य स्मृतींचा ठेवा पाहण्यासाठी या खोलीला भेट देतात. आकाशवाणी बातम्यांसाठी अनिकेत कोनकर, रत्नागिरी

**<u>मृद्गंधपुरस्कार</u>**

कार्यरत असताना मिळालेला मृद्गंध जीवनगौरव पुरस्कार अजून चांगलं काम करायला बळ देणारा आहे, अशी भावना लेखक - दिग्दर्शक पुरुषोत्तम बेर्डे यांनी विठ्ठल उमप फाऊंडेशनचा 'मृद्गंध जीवनगौरव पुरस्कार' स्वीकारताना व्यक्त केली. ज्येष्ठ अभिनेत्री रोहिणी हट्टंगडी यांच्या हस्ते काल ठाण्यात विविध क्षेत्रातल्या मान्यवरांना मृद्गंध पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आलं.

**<u>रुग्णवाहिका</u>**

बीडमध्ये प्राथमिक आरोग्य केंद्रांना चौदा रुग्णवाहिका मिळाल्या आहेत. या रुग्णवाहिकांमुळे जिल्ह्यातल्या आरोग्य सेवेला बळ मिळाल्याची भावना मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जिवने यांनी व्यक्त केली आहे.

इकडे, पालघर जिल्ह्यातल्या डहाणू इथं एका गर्भवती महिलेचा आणि तिच्या अर्भकाचा मृत्यू झाला असून रुग्णवाहिका वेळेत न मिळाल्यामुळे ही घटना घडली असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

**<u>क्रीडा-सायकलिंग</u>**

सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्र यांच्या मान्यतेनं अहिल्या नगर इथं काल पार पडलेल्या पाचव्या महाराष्ट्र राज्य रोड सायकलिंग अजिंक्यपद स्पर्धेत पुणे जिल्हा संघानं 30 गुणांसह सर्वसाधारण विजेतेपद पटकावलं, तर पुणे क्रीडा प्रबोधिनी संघानं 12 गुणांसह उपविजेतेपद पटकावलं. अहिल्यानगर संघ 10 गुणांसह तिस-या स्थानावर राहिला.

**<u>हवामान</u>**

राज्यात थंडीचा कडाका जाणवत असून कोकण आणि मध्य महाराष्ट्रात किमान तापमानात लक्षणीय घट झाली आहे. अनेक ठिकाणी पारा 10 अंशापर्यंत खाली घसरला असून नाशिक जिल्ह्यात निफाड इथं काल 8 पूर्णांक 3 दशांश अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे. पुढील दोन दिवस थंडीचा जोर राहणार असून हवामान सर्वत्र कोरडं राहण्याचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार